**महाविद्यालयांनी त्यांचे स्तरावर प्राप्त अर्जाची पडताळणी करावी, पडताळणी करतेवेळी विद्यार्थ्याचा विहित नमून्यातील अर्ज, पुर्वीच्या महाविद्यालयाचे ना-हरकत प्रमाणपत्र, प्रथम वर्षाचे गुणपत्रक, विद्यापीठ पात्रता प्रमाणपत्र ( आवश्यक असल्यास ) विद्यार्थ्यांनी त्याच्या अर्जासोबत जोडलेले आहे याची खात्री करावी, तद्नंतरच परिपूर्ण प्रस्ताव शिफारशींसह संचालनालयास विहीत मुदतीत हस्तपोच करण्यात यावा.**

संस्था बदलासाठी विद्यार्थ्यांनी ज्या महाविद्यालयासाठी विनंती केलेली आहे त्या महाविद्यालयाच्या प्राचार्यांनी याबाबतच्या प्रस्तावावर कार्यवाही उपरोक्त कालमर्यादेत होईल याची खबरदारी घ्यावी व आवश्यक तो पाठपुरावा करावा. तसेच प्रस्तावासोबत Annexure B & C मध्ये दर्शविल्यानुसार अचूक माहिती सादर करावी.

**( डॉ. धनराज माने )**
शिक्षण संचालक, उच्च शिक्षण
महाराष्ट्र राज्य, पुणे - १.

प्रत -

१. मा. सचिव, प्रवेश नियामक प्राधीकरण, ३०५, ३ रा मजला, शासकीय तंत्रनिकेतन इमारत, ४९ खेरवाडी, अलियावर जंग मार्ग, बांद्रा ( पुर्व ), मुंबई - ४०० ०५१ यांना माहितीस्तव सविनय सादर.

प्रत माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी -

१. सर्व विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य.
   २/- त्यांना कळविण्यात येते की, उपरोक्त सूचना त्यांच्या कार्यक्षेत्रातील विधी, शिक्षणशास्त्र, आणि शारीरिक शिक्षणशास्त्र महाविद्यालयांना आपल्या स्तरावरुन कळविण्यात याव्यात.
२. कुलसचिव, सर्व अकृषि विद्यापीठे, महाराष्ट्र राज्य.
३. प्राचार्य, सर्व विधी महाविद्यालये, महाराष्ट्र राज्य.
४. निवड नस्ती.

# महाराष्ट्र शासन
## शिक्षण संचालनालय, (उच्च शिक्षण)
## महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे ४११००१.

Web:www.dhepune.gov.in E-mail : mavi.dhepune@nic.in

फोन नं. ०२०/२६०५१७२९,२६१२२११९,२६०५१५१२, फॅक्स नं.०२०/२६११११५३

क्रमांक-उशिसं/विधी/प्र.क्र.६६-१७/सीईटीसेल/ ८७५९ दिनांक : 21 JUL 2017

**परिपत्रक**

**विषय : शैक्षणिक वर्ष २०१७-१८ मध्ये विधी ३ व ५ वर्षीय पदवी अभ्यासक्रमाच्या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचे पहिल्या वर्षानंतर संस्था / महाविद्यालय बदल करण्याबाबत . . .**

वाचा : १. महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २८- महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था ( प्रवेश व शुल्क यांचे विनियमन ) अधिनियम, २०१५

२. शासन अधिसूचना क्रमांक - टीईएम - २०१५/सीआर २३६/टीई-४, दि. ११.०३.२०१६

३. शासन अधिसूचना क्रमांक -सीईटी-२०१५/प्र.क्र.२४३(भाग-२)/मशि-२, दि.५.५.२०१७

४. शासन निर्णय क्रमांक - सीईटी-२०१७/प्र.क्र.१२४/मशि-२, दिनांक १२.०५.२०१७

उच्च शिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील विधी ३ व ५ वर्षीय पदवी अभ्यासक्रमाच्या केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेचे नियम दिनांक ०५.०५.२०१७ रोजीच्या महाराष्ट्र शासन राजपत्र ( असाधारण भाग चार-ब) अन्वये प्रसिध्द करण्यात आले आहेत. सदर राजपत्रात नियम क्रमांक १६ अन्वये पहिल्या वर्षानंतर पाठ्यक्रम किंवा संस्था बदलाबाबत पुढीलप्रमाणे तरतूद करण्यात आलेली आहे.

१. पहिल्या, दुसऱ्या, तिसऱ्या, किंवा चौथ्या वर्षानंतर उमेदवारांचा बदल पुढील पध्दतीने करण्यात येईल.

(क) पहिल्या, दुसऱ्या, तिसऱ्या किंवा चौथ्या वर्षात एकदा प्रवेश घेतलेला उमेदवार त्याच शैक्षणिक वर्षात इतर कोणतीही संस्था बदलून मागण्यास पात्र असणार नाही;

(ख) पहिले वर्ष ( पहिल्या आणि दुसऱ्या सत्रामध्ये ) किंवा दुसरे वर्ष ( तिसऱ्या आणि चौथ्या सत्रामध्ये ) किंवा तिसरे वर्ष ( पाचव्या आणि सहाव्या सत्रामध्ये ) किंवा चौथे वर्ष ( सातव्या आणि आठव्या सत्रामध्ये) परीक्षा सर्व विषयांमध्ये उत्तीर्ण असणारा किंवा उत्तीर्ण होण्यासाठी आवश्यक असलेल्या विषयांपैकी एका विषयात अनुत्तीर्ण असलेला उमेदवार, संस्था किंवा अभ्यासक्रम बदलून घेण्यास पात्र असल्याचे समजण्यात येईल.

परंतू, दुसऱ्या वर्षानंतर संस्था किंवा अभ्यासक्रम बदलण्यासाठी उमेदवाराने पहिले वर्ष उत्तीर्ण केलेले असले पाहिजे आणि तिसऱ्या वर्षानंतर बदली करण्यासाठी उमेदवाराने पहिले आणि दुसरे वर्ष उत्तीर्ण असला पाहिजेआणि चौथ्या वर्षानंतर बदली करण्यासाठी उमेदवार पहिले, दुसरे आणि तिसरे वर्ष उत्तीर्ण असावा.

(ग) विनाअनुदानित संस्थेतील विद्यार्थ्यांना कोणत्याही परिस्थितीत शासकीय किंवा शासकीय अनुदानित संस्था, विद्यापीठ विभाग, विद्यापीठ संचलित संस्था कोणत्याही टप्प्यावर बदलून घेता येणार नाही. तथापि, शासकीय किंवा शासकीय अनुदानित, विद्यापीठ विभाग, विद्यापीठ संचलित महाविद्यालयातील उमेदवाराला, विनाअनुदानित शैक्षणिक संस्थेमध्ये बदल करुन देण्याची मागणी करता येईल.

(घ) विद्यार्थी कोणत्याही टप्प्यावर स्वायत्त शैक्षणिक संस्थेमध्ये बदली होऊन जाऊ शकत नाही.

(ङ) विनाअनुदानित संस्थेमध्ये बदलून जाणे :- विनाअनुदानित संस्थांचे प्राचार्य हे उच्च शिक्षण संचालनालयाच्या पूर्व मान्यतेने, संस्थेचे ना-हरकत प्रमाणपत्र, संबंधित विद्यापीठाचे पात्रता प्रमाणपत्र ( विद्यापीठ बदल असल्यास ) व रिक्त जागाची स्थिती सादर केल्यावर बदल करुन घेण्याच्या मागणीसाठी इतर संस्थांमधील उमेदवारांचा विचार करतील. उमेदवार जो पाठ्यक्रम बदलून घेत आहे, त्या पाठ्यक्रमासाठी संबंधित विद्यापीटाने निर्धारीत केल्याप्रमाणे, उमेदवारांच्या पात्रतेची सुनिश्चिती संस्थेचे प्राचार्य करतील.

(च) संस्थेच्या / महाविद्यालयांच्या प्राचार्यांच्या शिफारशी शिवाय उच्च शिक्षण संचालनालयाकडून कोणताही अर्ज दाखल करुन घेतला जाणार नाही.

२. अधिसंख्य जागेतील कोट्यावर प्रवेश घेतलेल्या उमेदवारांना संस्था बदलून घेता येणार नाही.

केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेचे नियम दिनांक ०५.०५.२०१७ अन्वये प्रथम वर्षानंतर संस्था / महाविद्यालय बदलाची कार्यवाही करण्यासाठी संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य यांना प्राधीकृत केलेले आहे. त्यास अनुसरुन सदर नियमाच्या आधारे विधी ३ व ५ वर्षीय अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांच्या संस्था बदल करण्याबाबत खालील प्रमाणे कार्यवाही करण्याचे निर्देश देण्यात येत आहे.

१. विनाअनुदानित संस्थेतील प्रथम वर्षाचा अभ्यासक्रम यशस्वीपणे पूर्ण केल्यानंतर संस्था बदलण्याची विनंती करणाऱ्या उमेदवाराला, जागांच्या उपलब्धतेच्या अधीन राहून दुसऱ्या कोणत्याही विनाअनुदानित संस्थेत तसे करण्याची मुभा देण्यात येईल आणि हे बदल प्रथम वर्षाच्या किंवा प्रथम व द्वितीय सत्राच्या एकत्रित गुणांच्या आधारे करण्यात येतील. पाठ्यक्रमासाठी संबंधित विद्यापीठाने निर्धारीत केल्याप्रमाणे उमेदवारांच्या पात्रतेची सुनिश्चिती करण्याची जबाबदारी संबंधित महाविद्यालयाच्या / संस्थेच्या प्राचार्यांची असेल.
२. विद्यार्थ्यांनी महाविद्यालय / संस्था बदलण्यासाठी ज्या विनाअनुदानित संस्थेत बदलासाठी विनंती केली आहे (Aspiring Institute) त्या संस्थेत सोबतच्या Annexure - A नुसार विहित नमुन्यातील विनंती अर्ज, सध्या शिक्षण घेत असलेल्या महाविद्यालयाचे ना-हरकत प्रमाणपत्र, विद्यापीट बदल असल्यास विद्यापीट पात्रता प्रमाणपत्र, शिक्षणात खंड असल्यास त्याबाबत प्राचार्याचे प्रमाणपत्र किंवा रु. १००/- च्या स्टँप पेपरवर प्रतिज्ञापत्र, महाविद्यालय बदलीच्या कारणाच्या पृष्ठ्यर्थ पुरावे इ. दस्ताऐवजासह जमा करावा.
३. विद्यार्थ्यांनी ज्या विनाअनुदानित महाविद्यालयात महाविद्यालय बदलासाठी विनंती केली आहे त्या विनाअनुदानित महाविद्यालयाच्या प्राचार्यांनी त्यांचेकडे प्राप्त विनंती अर्जानुसार विद्यार्थ्यांच्या

गुणवत्तेच्या आधारे विहित नमुण्यातील अर्जावर आवश्यक ती माहिती भरुन अर्जात नमूद केलेल्या माहितीच्या अनुषंगाने आवश्यक दस्ताऐवजासह त्यांचेकडील रिक्त जागांची माहिती व ना-हरकत प्रमाणपत्रासह प्रस्ताव अभ्यासक्रमनिहाय सोबत जोडलेल्या वेळापत्रकानुसार संचालनालयास विहीत मुदतीत सादर करावेत. तसेच प्रस्तावासोबत Annexure B & C मध्ये दर्शविल्यानुसार अचूक माहिती सादर करावी. विहीत मुदतीनंतर प्राप्त झालेले प्रस्ताव दप्तरी दाखल करण्यात येतील व त्याबाबत कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही, याची नोंद घेण्यात यावी.

४. संस्था बदलासाठी विद्यार्थ्यांनी ज्या विनाअनुदानित संस्थेसाठी विनंती केलेली आहे त्या विनाअनुदातिन संस्थेच्या प्राचार्यांनी याबाबतच्या प्रस्तावावर कार्यवाही सोबतच्या जोडलेल्या कालमर्यादेत होईल याची खबरदारी घ्यावी व आवश्यक तो पाठपुरावा करावा. तसेच यासाठी विद्यार्थी किंवा पालक यांना या कार्यालयात व्यक्तीश: पाठविल्यास त्याची दखल घेतली जाणर नाही.

**शासकीय / अशासकीय अनुदानित / विद्यापीठ व्यवस्थापित अनुदानित संस्था / महाविद्यालयांतील बदलाबाबत : -**

अ) शासकीय / शासन अनुदानित / विद्यापीठ व्यवस्थापित अनुदानित संस्था / महाविद्यालयातुन दुसऱ्या शासकीय / शासन अनुदानित / विद्यापीठ व्यवस्थापित अनुदानित संस्था / विना अनुदानित संस्था / महाविद्यालयामध्ये पहिल्या, दुसऱ्या, तिसऱ्या व चौथ्या वर्षानंतर ( अभ्यासक्रमनिहाय लागू असल्याप्रमाणे ) महाविद्यालय बदलाची विनंती करता येईल.

ब) आपल्या महाविद्यालयातील जे विद्यार्थी इतर शासकीय / अशासकीय अनुदानित / विद्यापीठ व्यवस्थापित अनुदानित संस्था / विना अनुदानित संस्थेत (स्वायत्त संस्था वगळून ) बदलीसाठी इच्छुक आहेत, अशा विद्यार्थ्यांना उपरोक्त सुचना तसेच संदर्भ क्र. ३ व ४ मधील बदलीबाबतचे नियम निदर्शनास आणून द्यावेत. आपल्या महाविद्यालयातील जे विद्यार्थी इतर महाविद्यालयामध्ये बदलीसाठी आपणाकडे अर्ज करतील अशा सर्व विद्यार्थ्यांची बदली बाबत त्यांनी दिलेली कारणे ( वैद्यकीय, आर्थिक अडचण, पालकांची बदली इ.) नमूद करुन विद्यार्थ्यांची नावे गुणानुक्रमे व एकत्रितरित्या सोबत जोडलेल्या जोडलेल्या Annexure - B मध्ये भरुन संचालनालयास विहित मुदतीत सादर करावीत. आपणास असेही सूचित करण्यात येते की, आपल्या संस्थेत / विद्यापीठामध्ये परीक्षेचे निकाल गुणांऐवजी ग्रेड पॉईंटमध्ये देण्याची पध्दत असल्यास सदर ग्रेड पॉईंटचे संपूर्ण गुणांमध्ये अथवा टक्क्यांमध्ये रुपांतरित करुन गुण / टक्के नमूद करावेत.

क) विद्यार्थ्यांनी महाविद्यालय / संस्था बदलण्यासाठी ज्या महाविद्यालयात बदलासाठी विनंती केली आहे (Aspiring Institute) त्या संस्थेत सोबतच्या Annexure - A नुसार विहित नमुन्यातील विनंती अर्ज, सध्या शिक्षण घेत असलेल्या महाविद्यालयाचे ना-हरकत प्रमाणपत्र, विद्यापीठ बदल असल्यास विद्यापीठ पात्रता प्रमाणपत्र, शिक्षणात खंड असल्यास त्याबाबत प्राचार्याचे प्रमाणपत्र किंवा रु. १००/- च्या स्टँप पेपरवर प्रतिज्ञापत्र, महाविद्यालय बदलीच्या कारणाच्या पृष्ठ्यर्थ पुरावे इ. दस्ताऐवजासह जमा करावा.

ड)    संस्था बदलासाठी विद्यार्थ्यांनी ज्या महाविद्यालयासाठी विनंती केलेली आहे त्या महाविद्यालयाच्या प्राचार्यांनी याबाबतच्या प्रस्तावावर कार्यवाही सोबत जोडलेल्या कालमर्यादेत होईल याची खबरदारी घ्यावी व आवश्यक तो पाठपुरावा करावा. तसेच प्रस्तावासोबत Annexure B & C मध्ये दर्शविल्यानुसार अचूक माहिती सादर करावी. विषयांकित प्रकरणी विद्यार्थी किंवा पालक यांना या कार्यालयात व्यक्तीशः पाठविल्यास त्याची दखल घेतली जाणर नाही.

विषयांकित प्रकरणी कार्यवाही करतांना संदर्भ क्र. ३ मधील संबंधित अभ्यासक्रमाच्या प्रवेश नियमावलीतील तरतुदी / नियम स्पष्ट असून याबाबतची कार्यवाही करताना नियम तथा तरतुदींचे उल्लंघन झाल्यास त्या-त्या स्तरावरील प्राधीकाऱ्यास व्यक्तीशः जबाबदार धरण्यात येईल याची नोंद घ्यावी.

**( डॉ. धनराज माने )**
शिक्षण संचालक, उच्च शिक्षण
महाराष्ट्र राज्य, पुणे - १.

प्रत -

१. मा. सचिव, प्रवेश नियामक प्राधीकरण, ३०५, ३ रा मजला, शासकीय तंत्रनिकेतन इमारत, ४९ खेरवाडी, अलियावर जंग मार्ग, बांद्रा ( पुर्व ), मुंबई - ४०० ०५१ यांना माहितीस्तव सविनय सादर.

प्रत माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी -

१. सर्व विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य.
   २/- त्यांना कळविण्यात येते की, उपरोक्त सूचना त्यांच्या कार्यक्षेत्रातील विधी महाविद्यालयांना आपल्या स्तरावरुन कळविण्यात याव्यात.
२. कुलसचिव, सर्व अकृषि विद्यापीठे, महाराष्ट्र राज्य.
३. प्राचार्य, सर्व विधी महाविद्यालये, महाराष्ट्र राज्य.
४. निवड नस्ती.

# ANNEXURE - A

## APPLICATION FOR CHANGE OF COURSE OR INSTITUTION AFTER 1st Year

1. Name of the Student ( In Full) :
2. Name of the Course :
3. Academic year of Admission in the Present Institute : :
4. Academic year in which seeking Transfer :
5. Whether Admission is under Supernumerary quota (Yes/ No) :
6. Address for correspondence with : Pin code & Mobile No. :
   :
   :
7. Name of the Present Institute :____________________________________
   :____________________________________
8. Course of Study Details :
9. Details of the Result of the last exam.

| Course | Year / Semester | Year of Passing | Summer / Winter | No. of Attempt | Percentage | University |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | |
| | | | | | | |

10. Details of backlog subject ( if any) :
11. Name of aspiring institute where :____________________________________ Admission by transfer is sought :____________________________________
12. Name of the University to which above : College is affiliated :
13. Branch & year / semester and university : in which admission by transfer is sought :
14. Reasons for asking the transfer of : Institute / Change of University :

I the undersigned state on solemn declaration that the information stated above is true to my knowledge and belief. I am fully aware that transfer / change of institute / branch is not a right and it is up to the authority to decide my case on the basis of merit

**Date :** **(** Name & Signature of the Student **)**

## Annexure - B

### Statement Showing the list of Candidate applied for change of Institute for 2nd year

**Name of the College :**

**Name of the Course :**

**Name of the University to which college is affiliated :**

| Sr. No. | Name of the Students | Name of the Current Institute | Year and Course | Whether Admission is under Supernumerary quota ( Y/N) | Total Marks obtained out of | % of Marks | Details of backlog subject ( if any) | Preference wise Name of the Institute | Reason for Transfer | Remark |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | / | | | | | |
| | | | | | / | | | | | |
| | | | | | / | | | | | |

Date : / /

Seal of the College / Institute

Signature of Principal

( Note - Kindly submit Annexure - B Course wise Separately )

Annexure - C

## Statement Showing Vacancy Position for Academic Year 2017-18

**Name of the College :**

**Name of the Course :**

**Name of the University to which college is affiliated:**

| Sr. No | Name of Course | Year | Sanctioned Intake 2016-17 or respective year of 1st year* | Students asmitted A.Y. 2017-18 ( as per Col. 4 ) | Vacancy ( Col. 4-5) | Student in pipeline (Backlog passed students) | Students Shifted due to change of college | Net Vacancy availave [ (6)-(7+8)] |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 |
| | | Second | | | | | | |
| | | Third | | | | | | |
| | | Fourth | | | | | | |
| | | Final | | | | | | |
| | | | | | | | | |

Date : / / Seal of the College / Institute Signature of Principal

( Note - Kindly submit Annexure - C Course wise Separately )

* Sanctioned intake - As per Government / University.